# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८,
## वैद्यकीय विभाग
## सभावृत्तांत

धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ नुसार समितीचे सदस्यांची विविध विषयांवर चर्चा करणेकामी मा.आयुक्त सो. यांचेसमवेत दि.२९/०९/२०१५ रोजी स.१०.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीकरिता खालील अधिकारी उपस्थित होते.

१. श्री. राजीव जाधव, मा.आयुक्त
२. डॉ. के अनिल रॉय, आरोग्य वैद्यकीय अधिकारी
३. श्री. प्रमोद भोसले, मुख्यलेखापाल
४. श्रीमती पद्मश्री तळदेकर, मुख्यलेखापरिक्षक
५. डॉ. मनोज देशमुख, वैद्यकीय अधिक्षक
६. श्री. चंद्रकांत इंदलकर, का. क. अधिकारी तथा सचिव
७. श्री. मेहेर लहारे, प्रशासन अधिकारी, प्रशासन
८. श्री. निळकंठ पोमण, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी
९. श्री. बबनराव झिंझुर्डे, अध्यक्ष, कर्मचारी महासंघ,
१०. श्री. मनोज माछरे, सहमुख्य प्रवक्ता, कर्मचारी महासंघ
११. श्री. मधुकर रणपिसे, कार्याध्यक्ष, कर्मचारी महासंघ
१२. श्रीमती रेखा गाडेकर, प्रशासन अधिकारी (महिला)

धन्वंतरी स्वास्थ्य योजनेची अंमलबजावणी करित असतांना वेळोवेळी उदभवणा-या समस्यांविषयी तसेच कर्मचा-यांमार्फत प्राप्त होणा-या तक्रारींचे अनुषगाने चर्चा करणेकरिता बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१. एखाद्या कर्मचा-यांचे जागेवर त्याचे जावयास अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यात आली असल्यास अशा कर्मचा-याकरिता सेवानिवृत्त असलेले सासू सासरे हे अवलंबित म्हणून ग्राह्य धरता येणार नाहीत त्याकरिता सेवानिवृत्त कर्मचारी यांनी स्वतंत्ररित्या धन्वंतरी योजनेमध्ये सहभागी होणे आवश्यक आहे.

२. मनपामधील कर्मचारी हा भावाच्या जागी अनुकंपा तत्वावर नोकरीस लागलेला असून त्याने त्याच्या भावाच्या पत्नीशी विवाह केला असून भावाच्या मुलांचा समावेश करण्यात यावा अशी त्याने विनंती केलेली आहे. तथापि, या प्रकरणी धन्वंतरी कक्षामार्फत फक्त कुटुंब या व्याख्येमध्ये बसणा-या व्यक्तींचाच समावेश करण्याची कार्यवाही करावी.

३. सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचेबाबत फक्त त्यांचे पती / पत्नीकरिताच धन्वंतरी योजनेचा लाभ देय असल्याचे धोरणामध्ये नमूद असल्याने त्यांचेवर अवलंबित असलेले त्यांचे अपंग मुलामुलींना योजनेचा लाभ देय राहणार नाही. (धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरणामध्ये नमूद असलेले मतिमंद सभासद वगळून)

१२८०९
१०/११/१५

४. खाजगी रुग्णालयांप्रमाणे एमआरआय, सीटी स्कॅन व एक्स रे सेंटरसमवेत करारनामा करुन त्यांचा समावेश धन्वंतरी योजनेमध्ये करुन घेण्यात यावा व अशा सेंटरमध्ये बाह्यरुग्ण विभागांतून संदर्भित करण्यात येणा-या मनपा कर्मचा-यांस एमआरआय, सीटी स्कॅन व एक्स रे ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

५. ज्या अधिकारी / कर्मचारी यांना दुर्धर आजारांकरिता नियमितपणे गोळ्याऔषधे घेणे आवश्यक आहे अशा कर्मचा-यांना पूर्वीप्रमाणे बिलांची प्रतिपूर्ती करुन देण्यात यावी. तसेच आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी कोणते आजार दुर्धर स्वरुपाचे आजार म्हणून प्रतिपूर्ती करणेस पात्र राहतील याकरिता असे आजार निश्चित करावेत. त्यानंतर अध्यक्ष, कर्मचारी महासंघ यांनी वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये ना नफा ना तोटा या तत्वावर सुरु होणा-या मेडिकल स्टोअर मधून अशा दुर्धर आजारांकरिता लागणारी औषधे उपलब्ध करुन देण्यात येतील तसेच त्याकरिता धन्वंतरी योजनेअंतर्गत सदर मेडिकल स्टोअरला प्रत्यक्ष बिलींग सुविधादेखील कार्यान्वित करण्यात यावी अशी विनंती केली. त्यावर प्रत्यक्ष मेडिकल स्टोअर सुरु झाल्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल.

६. पॅनलव्यतिरिक्त अन्य रुग्णालयांमध्ये जाणूनबुजून उपचाराकरिता दाखल होणा-या अधिकारी / कर्मचारी यांना अशा प्रकारच्या उपचाराकरिता प्रतिपूर्ती करुन देण्यात येऊ नये. तथापि, तातडीक (Emergency) स्वरुपात दाखल झालेल्या पॅनलबाहेरील रुग्णालयांना प्रतिपूर्ती देय राहील.

७. अनुकंपा तत्वावर मनपा सेवेमध्ये असलेले कर्मचा-यांचे बाबतीत त्यांचे आई व वडील दोघेही हयात नसल्यास त्यांचेवर अवलंबून असलेल्या भाऊ / बहीणीचा समावेश योजनेमध्ये करणेबाबत विनंती अर्ज प्राप्त झालेला आहे. तथापि, भाऊ अथवा बहीण हे धन्वंतरी स्वास्थ्य योजनेच्या धोरणामध्ये येत नसल्यामुळे त्यांना धन्वंनतरी योजेनेचा लाभ देय राहणार नाही.

८. केईएम रुग्णालयामार्फत त्यांचे रुग्णालयामध्ये धन्वंतरी योजनेअंतर्गत दाखल होणा-या मनपा कर्मचा-यांकरिता आयसीयु / एनआयसीयु / पीआयसीयु करिता ७५% रक्कम अग्रिम म्हणून देय करावी याकरिता विंनती करण्यात आलेली आहे. तथापि, अशा प्रकारे अग्रिम देण्याची तरतूद धन्वंतरी योजनेमध्ये नसल्यामुळे तसेच केईएम रुग्णालयास अग्रिम मंजूर केल्यास इतर रुग्णालयांमार्फतही अशी मागणी करण्यात येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे केईएम रुग्णालयाची मागणी अमान्य करण्यात यावी. तथापि, त्यांचेकडील प्राप्त होणा-या बिलांची प्राथमिकतेने अदायगी करण्यात यावी.

९. धन्वंतरी योजनेअंतर्गत मद्यपान केल्यामुळे होणा-या आजारांवर उपचार करण्यात येणार नाही अशी अट आहे. तथापि, मद्यपान केल्यानंतर होणा-या अपघाताचे (एम.एल.सी. केसेस) परिस्थितीमध्ये देखील सदरची अट लागू राहील. अशा प्रकरणी महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचा-यांना व त्यांचे अवलंबितांना योजनेचा लाभ देय राहणार नाही.

१०. पर्यवेक्षक अन्न व अन्न निरिक्षक यांनी धन्वंतरी योजनेमध्ये सभासदत्व मिळणेकामी अर्ज सादर केलेला आहे. तथापि, वरील कर्मचा-यांची सेवा अन्न व औषध प्रशासनाकडे वर्ग करण्यात आलेली असल्यामुळे त्यांना योजनेमध्ये सभासदत्व देय राहणार नाही. तसेच यापुढे सदरचा विषय पुन:श्च कार्यपत्रिकेवर घेण्यात येऊ नये.

११. धन्वंतरी स्वास्थ्य योजनेचा लाभ नको असल्याबाबत कर्मचा-यांचे अर्ज प्राप्त होत आहेत. तथापि, धन्वंतरी स्वास्थ्य योजना ही सर्व मनपा अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता महापालिका सभेचे मान्यतेने लागू करण्यात आली असल्यामुळे अशा अर्जांवर स्वतंत्र निर्णय घेणे शक्य नाही. त्यामुळे अशा अधिकारी / कर्मचा-यांना योजनेमध्ये सहभागी करुन घेणेकरिता प्रवृत्त करावे.

१२. श्री.अविनाश जाधव यांनी त्यांचे २५ वर्षापेक्षा अधिक वयाच्या मुलीचा योजनेमध्ये समावेश करणेबाबत विनंती केलेली आहे. तथापि, सदरची बाब धोरणामध्ये नमूद अटींची पूर्तता करणारी नसल्यामुळे विनंती अमान्य करण्यात येत आहे.

१३. सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांनी व मुख्याध्यापकांनी धन्वंतरी योजनेमध्ये सभासदत्व मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे. तथापि, शिक्षण मंडळामध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांचे वेतन हे ५०% राज्य शासन व ५०% महानगरपालिका यांचेमार्फत अदा करण्यात येते. त्यामुळे धन्वंतरी योजनेमध्ये त्यांचा समावेश करतेवेळी महापालिका हिस्सा हा त्याच प्रमाणात देय राहील. याकरिता शिक्षण मंडळातील सेवानिवृत्त कर्मचा-यांकरिता र.रु. ३००/- व मनपा हिस्सा म्हणून र.रु.१५०/- या अटीवर सेवानिवृत्त मुख्याध्यापक व शिक्षकांचा योजनेमध्ये समावेश करण्यात यावा. याचप्रमाणे अध्यक्ष, पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघ यांनी शिक्षण मंडळामध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांकरितादेखील योजनेचा लाभ देण्यात यावा अशी विनंती केलेली आहे. त्यानुसार वरीलप्रमाणेच शिक्षण मंडळातील शिक्षकांकरिता र.रु. ६००/- व मनपा हिस्सा र.रु. ३००/- याप्रमाणे निश्चित करुन त्यांचा समावेश धन्वंतरी स्वास्थ्य योजनेमध्ये करण्यात यावा. तथापि, धन्वंतरी स्वास्थ्य योजनेमध्ये शिक्षण मंडळाचे कर्मचा-यांचा समावेश करणेकरिता सक्षम समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे किंवा कसे? याबाबत तपासणी करुन पुढील निर्णय घेण्यात यावा.

१४. धन्वंतरी स्वास्थ्य योजनेमध्ये जळीत रुग्णांवर उपचार करणा-या रुग्णालयांचा समावेश नाही. पुणे शहरामध्ये फक्त एकाच रुग्णालयामध्ये जळीत रुग्णांवर उपचाराची सुविधा असल्यामुळे त्याठिकाणी दाखल होणा-या रुग्णांना बिलांची नियमानुसार प्रतिपूर्ती करुन देण्यात यावी.

१५. धन्वंतरी स्वास्थ्य योजनेची अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर योजनेतील रेट लिस्ट मध्ये नमूद नसलेल्या शस्त्रक्रिया / उपचारांकरिता अन्य रुग्णालयांकडून असे दर मागवून ते सर्व रुग्णालयांना ते कळविण्यात आलेले आहेत. सदर दरांस मान्यता देण्यात येत आहे. तसेच याव्यतिरिक्तदेखील धन्वंतरी अंतर्गत रेटलिस्ट मध्ये नमूद नसलेल्या दरांकरिता अन्य

रुग्णालयांचे तुलनात्मक दर तपासून आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी ते रुग्णालयांना कळवावे व तदनंतर मान्यतेकामी धन्वंतरी समितिपुढे वेळोवेळी सादर करावेत.

१६. अध्यक्ष, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ, यांनी मनपा कर्मचा-यांकरिता धन्वंतरी योजनेअंतर्गत श्रवणयंत्र खरेदी करणेबाबत मान्यता मिळणेकामी विनंती केलेली आहे. तथापि, कामगार कल्याण विभागामार्फत याकरिता स्वतंत्र तरतूद उपलब्ध असल्याचे कामगार कल्याण अधिकारी यांनी कळविल्यामुळे श्रवणयंत्र खरेदीकामी धन्वंतरी योजनेमधील तरतूद खर्ची टाकण्यात येवू नये.

१७. धन्वंतरी योजनेमध्ये समाविष्ट रुग्णालयांमार्फत कर्मचा-यांकडून प्रशासकीय शुल्क वसूल करण्यात येत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. याप्रकरणी अशा रुग्णालयांना प्रशासकीय शुल्क न आकारण्याबाबत कळविण्यात यावे. तथापि, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी मोठ्या रुग्णालयांशी चर्चा करुन प्रशासकीय शुल्क २ ते ३ टक्क्यांपर्यंत आकारणेबाबत विचारणा करावी. अशा प्रकारे निर्णय झाल्यास प्रशासकीय शुल्क धन्वंतरी योजनेतून अदा करणेबाबत अलाहिदा निर्णय घेण्यात येईल.

१८. हॉर्मोन्स संबंधी उपचाराकरिता (Hormone Treatment) देण्यात येणारी औषधे ज्या अधिकारी / कर्मचारी यांचेमार्फत घेण्यात येतात ती धन्वंतरी योजनेअंतर्गत देय राहणार नाहीत.

| | |
|---|---|
| चंद्रकांत इंदलकर<br>कामगार कल्याण अधिकारी | रेखा गाडेकर<br>प्रशासन अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| पद्मश्री तळदेकर<br>मुख्यलेखापरिक्षक | प्रमोद भोसले<br>मुख्यलेखापाल | निळकंठ पोमण<br>माहिती व तंत्रज्ञान अधिकारी |
| डॉ.मनोज देशमुख<br>वैद्यकीय अधिक्षक | मधुकर रणपिसे<br>सदस्य, धन्वंतरी योजना | मनोज माछरे<br>सदस्य, धन्वंतरी योजना |
| बबनराव झिंझुर्डे<br>अध्यक्ष, कर्मचारी महासंघ | डॉ. के अनिल रॉय<br>आरोग्य वैद्यकीय अधिकारी | राजीव जाधव<br>आयुक्त |